वाचले: - मा.आयुक्त यांचा दि. २५/१२/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८, स्वच्छ महाराष्ट्र / भारत
अभियान प्रकल्प अंमलबजावणी कक्ष
क्र. स्वभाअक/ 9 /कावि/ 229/२०२१
दिनांक – २७/१२/२०२१

कर्तव्यदक्ष जनहिताय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

विषय: - महानगरपालिकेच्या कार्यक्रमप्रसंगी शुन्य कचरा (Zero Waste) मानक कार्यप्रणालीचा अवलंब करणे.

आदेश,

पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये सहभागी असून स्वच्छ सर्वेक्षणाकरिता आवश्यक असलेल्या बाबींची महानगरपालिकेमार्फत पूर्तता करण्यात येत आहे. तसेच शहरातील कचरा कमी करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत विविध नवनविन उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येत आहे.

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये कच-याचे प्रमाण कमी होण्यासाठी महापालिकेतील विभागांमध्ये होणा-या कार्यक्रमप्रसंगी शुन्य कचरा (Zero Waste) कार्यपध्दतीचा अवलंब करणेकामी मानक कार्यप्रणाली (SOP-Standard Operating Procedures) प्रामुख्याने भर देण्याचे निर्देश आहेत. स्वच्छ सर्वेक्षणामध्ये सूचित केलेनुसार महापालिकेतील कार्यक्रमांमध्ये ( जसे मोहिम, स्पर्धा, चर्चासत्र व्याख्याने परिसंवाद संमेलन, उदघाटने भूमीपुजन, सत्कार समारंभ इ.) मानक पध्दतींचा अवलंब करणे आवश्यक आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८, प्रस्तुतचे आदेशान्वये महानगरपालिकेमार्फत सर्व विभागामध्ये होणा-या कार्यक्रमांमध्ये सोबत जोडलेल्या मानक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा, असे आदेशित करीत आहे.

25/12/21

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति,

१) सर्व विभागप्रमुख
२) माहिती व जनसंपर्क विभाग

# स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान प्रकल्प अंमलबजावणी कक्ष

## महानगरपालिकेच्या कार्यक्रमप्रसंगी शुन्य कचरा (Zero Waste) मानक कार्यप्रणालीचा अवलंब करणे.

**आदेश क्रमांक –स्वमअक/१/कावि/२२९/२०२१ दिनांक२७/१२/२०२१ लगत**

**अ. प्रवेशप्रसंगी -**

१) कार्यक्रमासंबंधी माहिती प्रदर्शित करण्यासाठी प्लास्टिक / फ्लेक्स पोस्टर्स / चिन्हे यांचा वापर करु नये. कापड, ताग, कागद इ. इको-फ्रेंडली सामग्रीवर सर्व पोस्टर्स / चिन्हे छापावीत.

२) गेटवरील स्वागत फलकावर हा स्वच्छ कार्यक्रम ( झिरो वेस्ट इव्हेंट ) असल्याचे स्पष्टपणे नमूद करावे

३) सजावटसाठी प्लॅस्टिकची फुले वापरु नये.

४) फूट ऑपरेटेड सॅनिटायझर मशीन प्रवेशद्वार व इतर आवश्यक ठिकाणी वर ठेवाव्यात.

५) दिव्यांग/ अंपग व्यक्तींच्या प्रवेशासाठी रॅंप/व्हील चेअरची सुविधा असावी.

**ब. स्वागतप्रसंगी-**

१) पाहुण्यांची नोंदणीकरीता लॅपटॉप, टॅब यांचा वापर करुन रजिस्ट्रेशन करावे.

२) नेमटॅग/ सहभागी प्रतिनिधी यांची नावे दर्शविण्यासाठी कार्डबोर्ड/ज्यूट/कापडाचा वापर करावा.

३) भेट देण्यासाठी प्लास्टीक, थर्माकोल, फोम याचा वापर न करता स्वच्छ भारत अभियान/ स्वच्छाग्रह याचा लोगो वापरुन कापड, ज्युट यापासुन बनविलेल्या वतु, रोपे, स्टीलचे वस्तु, मापडी मास्क इ. वस्तुंचा वापर करण्यात यावा.

४) कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी वापरण्यात येणा-या साहित्यामध्ये (जसे कार्यक्रमपत्रीका/ कागदपत्रे/ प्रकाशने/ निमंत्रण) याकरीता QR कोड चा वापर करावा.

**क. कार्यक्रमाच्या ठिकाणी-**

१) पिण्याच्या पाण्याकरीता कोणत्याही आकाराच्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा वापर करु नये.

२) व्यासपिठावरील टेबलांवर सदस्यांसाठी पिण्यासाठी काचेच्या किंवा स्टीलच्या ग्लास/तांबे/बाटली यांचा वापर करावा.

३) कार्यक्रमाच्या ठिकाणी कुठेही प्लास्टिकचे कटलरी/ कप/प्लेट यांचा वापर करु नये फक्त बायो-डिग्रेडेबल पर्यावरणपूरक कटलरी/ कप/प्लेट यांचा वापर करावा.

४) कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी बुकलेट/पॅम्प्लेट/माहितीपत्रक इ.चा वापर न त्या वेबसाईट /व्हाटसऍप ग्रुप/ सादरीकरण/ई-मेल/ QR कोड माध्यमातुन प्रसिध्द करण्यात यावीत.

५) कार्यक्रमाच्या ठिकाणी व परिसरात बाहेरील खाद्यपदार्थ/ पेय आदींचा वापर करु नये.

६) ओल्या कच-यासाठी हिरवी व सुका कचरा यासाठी निळी डस्टबीन सहज दिसतील अशा ठिकाणी ठेवावीत.

**ड. जेवणाच्या ठिकाणी**

१) जेवणाच्या ठिकाणी कुठेही प्लास्टिकचे कटलरी/ कप/प्लेट यांचा वापर करु नये फक्त बायो-डिग्रेडेबल पर्यावरणपूरक कटलरी/ कप/प्लेट यांचा वापर करावा.

२) अन्न वाया जाणार नाही याकरीता आयोजकांनी आश्रम/स्वयंसेवी संस्था यांचेशी संपर्क करुन उरलेले अन्न दयावे.

३) हिरवी व सुका कचरा यासाठी निळी डस्टबीन ठेवावीत. त्यावर 'माझा कचरा, माझी जबाबदार, ' प्रत्येकदिवशी दोन डस्टबीन' इत्यादी संदेश लावावेत.

**ई. स्वच्छतागृहामध्ये-**

१) महिला व पुरुषांसाठी स्वच्छता गृहाची स्वतंत्र व्यवस्था व फलक असावेत. पाणी, लाईटची व्यवस्था असुन कडी, कोयंडे,नळ सुस्थितीत असावेत. वायुविजनाची व्यवस्था असावी. स्वच्छतागृह स्वच्छ असावेत.

२) वॉश बेसिनच्या ठिकाणी पाणी बचत/ हात धुणे इ. चिन्ह/ फलक लावण्यात यावे.

३) महिलांच्या स्वच्छतागृहामध्ये सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन, सॅनिटरी पॅड गुंडाळण्यासाठी वेस्टपेपर, सॅनिटरी पॅड्सची विल्हेवाट लावण्यासाठी सॅनिटरी वेस्ट लेबलचे लाल रंगाचे डस्टबीन ठेवावेत.

४) प्रत्येक स्वच्छतागृहांमध्ये स्पर्श न होईल अशा प्रकारे सेन्सर साबण डिस्पेंसर आणि सॅनिटायझर डिस्पेंसर मशीन असावेत.

२७/१२/२१

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८